**संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य योजना जिल्हा आस्थापना वेतन व वेतनेतर खर्चासाठी सन २०२६-२७ वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत. (माहे जुलै ते ऑगस्ट, २०२६ करिता)**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : विसयो -२०२६/प्र.क्र.३८/विसयो**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २८ जुलै, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१८/प्र.क्र.६२/ विसयो, दि.२०.०८.२०१९.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र.विसयो-२०२६/प्र.क्र.३८/विसयो, दि.३०.०४.२०२६

**शासन निर्णय :-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रु.१५९,१८,२९,०००/- (रुपये एकशे एकोणसाठ कोटी अठरा लक्ष एकोणतीस हजार फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी रु.६३,८४,७५,०००/- (रुपये त्रेसष्ट कोटी चौऱ्याऐंशी लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रु.४७,७५,४८,७००/- व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी रु.१९,१५,४२,५००/- इतका निधी संदर्भ क्र. ०३ अन्वये सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यात आला आहे.

आता, वित्त विभागाने वितरीत केलेल्या उर्वरित तरतूदीमधून ०१-वेतन या उद्दिष्टासाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी **रु.२३,२१,९६,४००/-** (रुपये तेवीस कोटी एकवीस लक्ष शहाण्णव हजार चारशे फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी **रु.९,५२,२१,९५०/-** (रुपये नऊ कोटी बावन्न लक्ष एकवीस हजार नऊशे पन्नास फक्त) इतका निधी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांना माहे जुलै ते माहे ऑगस्ट, २०२६ या कालावधीकरीता बिम्स प्रणालीवरील तरतूदीमधून सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे निधी वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात येते की, त्यांनी या सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ व ब प्रमाणे वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार करावे व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तालुक्यांना अनुदानाचे आवश्यकतेनुसार वाटप करावे.

३.	सदरहू वितरीत अनुदान संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१), सर्वसाधारण आस्थापना" या लेखाशीर्षाखाली आणि वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेच्या खर्चासाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, (०१) (०१) वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४.	सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

५.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६ अन्वये विभागांना दिलेल्या प्रशासकीय प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८१४४४००१०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.07.28 14:48:24 +05'30'

**( विवेक शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती).
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (विसयो).

## <u>विवरणपत्र- अ</u>

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०२६/प्र.क्र.३८/विसयो, दिनांक २८ जुलै, २०२६ सोबतचे विवरणपत्र मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१),सर्वसाधारण आस्थापना" सन २०२६-२६ वर्षातील **माहे जुलै ते ऑगस्ट, २०२६** करिता निधी वितरण.

**(रुपये हजारात)**

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | संगणक सांकेतांक | ०१ वेतन |
|---|---|---|---|
| १ | पुणे | (०१) (०१) (२०५३ १११३) | ४०७०५.०५० |
| २ | कोकण | (०१) (०२) (२०५३ ११२२) | ३९०८८.२०० |
| ३ | नाशिक | (०१) (०३) (२०५३ ११३१) | ४५२४९.३०० |
| ४ | नागपूर | (०१) (०४) (२०५३ ११४२) | ३७२४२.६०० |
| ५ | अमरावती | (०१) (०५) (२०५३ ११५१) | ३९०७२.६०० |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | (०१) (०६) (२०५३ ११६९) | ३०८३८.६५० |
| **एकूण** | | | **२३२१९६.४००** |

## <u>विवरणपत्र - ब</u>

मागणी क्रमांक एन-**२**, मुख्य लेखाशीर्ष **२०५३**, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, **(०१) (०१)** वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च **(२०५३ ११७८)**" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

सन २०२६-२६ वर्षातील **माहे जुलै ते ऑगस्ट, २०२६** करिता निधी वितरण.

**(रुपये हजारात)**

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | संगणक सांकेतांक | ०१ वेतन |
|---|---|---|---|
| १ | पुणे | (०१) (०१) (२०५३ १११३) | १५८७०.३२५ |
| २ | कोकण | (०१) (०२) (२०५३ ११२२) | १५८७०.३२५ |
| ३ | नाशिक | (०१) (०३) (२०५३ ११३१) | १५८७०.३२५ |
| ४ | नागपूर | (०१) (०४) (२०५३ ११४२) | १५८७०.३२५ |
| ५ | अमरावती | (०१) (०५) (२०५३ ११५१) | १५८७०.३२५ |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | (०१) (०६) (२०५३ ११६९) | १५८७०.३२५ |
| **एकूण** | | | **९५२२१.९५०** |

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.07.28 14:48:43 +05'30'

**( विवेक शिंदे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**